शेजारच्या घरात...

"समोरच्या पाटलांच्या मंजुळाची त्या किशन म्हेत्रेशी भानगड आहे!"
"सरोद्यांच्या सुनेचं सासूशी पटत नसावं. सारखी धुसफूस चाललेली असते!"
"बावळ्यांच्या मुलाला कावळ्यांच्या नातवाने काल धोपटलं. आज त्या दोन गटांत जोरदार मारामारी झाली!"
एखादा चोंबडा नोकर अख्ख्या सोसायटीला अशा 'कथा रम्या' ऐकवतो आणि त्या उत्कंठेने ऐकल्याही जातात. त्यांना मीठमसाला लावून त्या शिळोप्याच्या गप्पांत तोंडीलावणं म्हणून वापरल्या जातात.
दुसऱ्याच्या भानगडींत रस घेऊन काय मिळतं माणसांना?

सगळ्याच प्राणिमात्रांना भोवतालच्या जगातल्या घडामोडींत रस असतो. त्यांच्यातल्या बहुतेक घडामोडींचा त्यांच्या जीवनमरणाशी थेट संबंध असतो. आदिमानव त्यामानाने अधिक उत्क्रांत, कळपात रहाणारा होता. त्याची सुरक्षितता त्याच्या कळपातल्या भाऊबंदांवर अवलंबून होती. त्यांच्यातल्या भांडण-तंटे-मारामाऱ्यांनी कळप फुटायची शक्यता असे. शिवाय दुसऱ्यावर कोसळलेल्या संकटाने आपलं नुकसान होणारच नाही याची खात्री नसे. त्यामुळे आदिमानवाचं त्याच्या भाऊबंदांच्या संकटांवर, भांडणांवर बारीक लक्ष असे.

पुढे कळपाचा समाज झाला; सुरक्षितता वाढली. पण लक्ष ठेवणं चालूच राहिलं आहे. दुसऱ्यांच्या सुखासमाधानाच्या संसारात कुणाला स्वारस्य नसतं पण उणीवांत, भांडणतंट्यात रस असतोच. काहीजण चांभारचौकशा आणि ढवळाढवळ करतात. तो चोंबडेपणा वाईट असतो यात शंका नाही. पण अनेकांच्या नजरेमागे चौकसपणा, विचारी मन असतं. त्यांच्या नजरेला दुसऱ्यांच्या समस्या कळतात; त्यांच्यावरच्या उपायांबद्दल मनात ऊहापोह होतो; स्वतःच्या आयुष्यात पुढे येणाऱ्या समस्या सोडवायच्या पध्दतींचे पर्याय सुचतात. कधी ते प्रश्न त्या पर्यायांहून वेगळ्याच,

अभिनव पध्दतीने सोडवलेले दिसतात. ते पाहून त्यावरून स्वतःच्या तशाच अडचणी सोडवायचे नवे मार्ग समजतात.

ज्यांना त्यांचं कुतूहल असं दुसऱ्यांच्या भानगडींत रस घ्यायला लावतं त्या लोकांना टीव्हीच्या मालिका बघायला, कथाकादंबऱ्या वाचायलाही आवडतात. त्या तर पूर्णपणे परक्या असलेल्या पात्रांच्या आयुष्यांत, त्यांच्या भानगडीत डोकावण्यासाठी सताड उघडून दिलेल्या खिडक्याच असतात. त्या काल्पनिक, ऐतिहासिक पात्रांमधले गैरसमज ध्यानात येतात. दुसऱ्याचं म्हणणं नीट ऐकून न घेणं; पूर्वग्रहाने दूषित असलेल्या नजरेनेच वस्तुस्थितीकडे बघणं; दुराग्रही निर्णय घेणं यांच्यातले तोटे समजतात. विनाकारण होणारी भांडणं कशी टाळावी ते समजतं. दुसऱ्यांची दुःखं समजून घेणं जमतं. त्यांच्याशी सह-अनुभूती वाढत जाते. समाजाचा घटक म्हणून जगायची क्षमता वाढते.

अशाच कुतूहलामुळे मोठ्या माणसांची चरित्रं लिहिली-वाचली जातात. प्रतिष्ठितांनी, समाजधुरीणांनी त्यांच्या खाजगी जीवनांतल्या बाक्या प्रसंगांना कसं तोंड दिलं ते जाणून घेतल्याने अधिकच मोलाचे धडे मिळतात.

शिकाऊपणा हा माणसाचा स्थायी गुण आहे. अनवधानानेही ढवळाढवळ होऊ नये म्हणून स्वतःचे हात मागे बांधून ठेवले; नाक न खुपसता फक्त डोळे आणि कान वापरले आणि दुसऱ्याच्या खाजगी आयुष्यात डोकावलं तर 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' या न्यायाने दुसऱ्यांच्या चुकांमधून अप्रत्यक्षपणे बरंच शिकता येतं. आयुष्याच्या शाळेतल्या शिक्षणाचा तो एक फार महत्त्वाचा भाग आहे.

डॉ. उज्ज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com

('esakal.com' च्या सौजन्याने)